• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३२९ • शुक्रवार,दि.१ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये

•Beed (Maharashtra) •Year 3 • Issue 329 • Friday 1 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

## लोकसभेची हिंगोलीची जागा ठाकरे गटाकडे?



परभणी - महाविकास आघाडीच्या जागा वाटपाचा फार्म्युला ठरल्याचे जवळपास निश्चित झाल्याचे बोलले जात आहे. हिंगोली लोकसभेची जागा ठाकरे गटाला सोडण्यात आल्याची चर्चाही सुरू झाल्याने ठाकरे गटाकडून इच्छुक असणार्या उमेदवारांचे हौसले बुलंद झाले आहेत. मागील काही दिवसांपासून महाविकास आघाडीतील सर्वच पक्षांमध्ये संभ्रमाचे वातावरण होते. परंतू आता हळुहळू जागा वाटपाच्या दिशेने चर्चा सुरू झाल्याने ठाकरे गटातील कार्यकर्त्यांना हायसे वाटू लागले आहे. (डेज्ञ डरलहर एश्रशलींळेप २०२४) हिंगोली लोकसभा मतदार संघावर कायम शिवसेनेचे वर्चस्व राहिले आहे. सध्या शिंदे गटात गेलेले विद्यमान खासदार हेमंत पाटील हे २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेकडून विजयी झाले होते. परंतू शिवसेनेमध्ये पडलेल्या फुटीनंतर खासदार पाटील यांनी शिंदे गटासोबत जाण्याचा निर्णय घेतला. तर दुसरीकडे महाविकास आघाडीकडून लोकसभा निवडणुक लढविली जाणार असल्याने हिंगोली लोकसभा मतदार संघावर ठाकरे गटाबरोबरच काँग्रेस, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दावा सांगितल्याने तिढा निर्माण झाला आहे. काही दिवसांपुर्वी माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर हेच महाविकास आघाडीचे उमेदवार राहील अशी चर्चा सुरू झाली असतानाच बुधवारपासून मात्र हिंगोली लोकसभा मतदार संघ ठाकरे गटाकडेच राहणार असल्याचे बोलले जात आहे.

## परळी नगर परिषदेमध्ये चोरी



परळी - परळी नगर परिषदेच्या कार्यालयात घुसून नगरपरिषदेवर डल्ला मारण्याचा प्रयत्न चोरट्यांनी केल्याचे प्रकरण समोर आले आहे. आज (दि. २९) पहाटेच्या सुमारास घडलेल्या या घटनेने नगर परिषदेच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. संभाजीनगर व शहर पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या परळी नगर परिषदेत गुरूवारी (दि. २९) पहाटे अज्ञात तीन अज्ञातांनी पाठीमागील दरवाजाने कार्यालयात घुसून काही कपाटांचे कुलूप तोडून चोरीचा प्रयत्न केला. या चोरट्यांना शोध घेण्याचे मोठे आव्हान असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. गेल्या काही दिवसांपासून परळी शहर व परिसरात चोर्यांचे प्रमाण वाढले आहे. दोन्ही पोलीस ठाण्याच्या बाजूस असलेल्या परळी नगर परिषदेत आज (दि. २९) पहाटे ३ वाजून २२ मिनीटांनी तीन अज्ञात चोरटे तोंडाला मास्क बांधूननगर परिषदेच्या कार्यालयात पाठीमागील दरवाजाने आत घुसले. त्यांनी कार्यालयातील काही कपाटांची कुलूपे तोडली मात्र कुठलीही फाईल अथवा रोकड नेली नसल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून येत आहे.

## गेवराई शहरात गुटख्याचा साठा पकडला

गेवराई - शहरातील गजानन नगर कोल्हेर रोड भागात एका किराणा दुकानात अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने केलेल्या कारवाईत राज्यात विक्री प्रतिबंधित केलेला २४ हजार ८२० रुपये किमतीचा गुटखा पान मसाला जर्दा आणि सुगंधी तंबाखूचा माल जप्त करण्यात आला. २८ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी अन्नसुरक्षा अधिकारी महेंद्र बापूराव गायकवाड यांनी फिर्याद नोंदवली. त्यांच्या तक्रारीवरून आरोपी अमर अजित शेख (रा. संजयनगर, गेवराई) याच्याविरुद्ध किराणा दुकानात मानवी आरोग्यास अपायकारक व घातक असलेला गुटखा व तंबाखूचा साठा विक्रीसाठी साठवणूक केल्याच्या कारणावरून गुन्हा दाखल करण्यात आला.

# ८५ कोटींचे बेकायदा उत्खनन तरी प्रशासन गप्प का? - देशमुख

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यात परवानगी नसताना खडी क्रेशर आणि खदानीतून उत्खनन मोठ्या प्रमाणात चालू आहे. प्राप्त माहितीनुसार या लोकांकडे ८५ कोटी रुपयांची थकबाकी आहे. ती वसूल करण्याऐवजी त्यांचे लाड संगणमत आणि पुरवले जात असल्याचे यावरून दिसते. तर दुसरीकडे या सर्व क्रशर आणि खदान धारकांचे वीज कनेक्शन कट करण्याचे आदेश दिल्यानंतर ते कट केले गेले, परंतु त्यानंतरही ह्या वीज जोडण्या पुन्हा जोडून उत्खनन चालू असल्याचा गंभीर प्रकार दिसत आहे. दरम्यान राज्याचे मुख्य सचिव नितीन करीर यांनी यात तात्काळ लक्ष घातले. त्यांनी प्रधान सचिव, महसूल यांना यात तात्काळ कारवाई बाबत आदेश दिले. याबाबत आपण जिल्हा प्रशासनाकडे सुध्दा कारवाईची मागणी केली असून यात तात्काळ कार्यवाही न केल्यास आम्हास आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल, असा स्पष्ट इशारा जनआंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी दिला आहे.**



बीड जिल्ह्यात साठ खडी क्रशर आणि त्यासोबत खानपट्टा/ खदानी मार्फत मुरूम आणि दगड उत्खनन करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. या उद्योगापैकी त्रेपन्न उद्योगांची खडी क्रशर आणि खदानीची मान्यता संपलेली आहे. ही बाब सातत्याने पुढे येत आहे. मात्र तरीही या खदानधारकांसोबत आणि क्रेशर धारकांसोबत संगणमताने करून त्यांचे उद्योग पोसले जात आहेत. साठ पैकी ५३ उद्योग बिनधिकृतपणे चालू असून त्यांनी प्रत्येकाने जवळपास दोन एकर पेक्षा जास्त जागेवर खोदकाम करून मुरूम आणि दगडाचे उत्खनन केले आहे. एकीकडे हजार - बाराशे ब्रासची कर पावती फाडायची आणि दुसरीकडे काही एकरांमध्ये उत्खनन करायचे, ही बाब चालू असताना त्या त्या भागातील तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार हे संगणमत करत असल्याचे दिसत आहे. तर दुसरीकडे जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ७ फेब्रुवारी २०२४ रोजी अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना या बेकायदा लोकांची वीज कनेक्शन तोडण्याचे आदेश दिले.



त्यानंतर त्यांनी कार्यकारी अभियंता आणि उप कार्यकारी अभियंता सह त्यांच्या खात्यातील इतर तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना हे वीज कनेक्शन तोडण्याचे आदेश दिले. अनेक ठिकाणी हे वीज कनेक्शन तोडले गेले. मात्र त्यानंतर ते पुन्हा जोडून आजही बेकायदा धंदा चालू असल्याच्या तक्रारी आहेत. इतकेच नाही तर हे कनेक्शन तोडल्यानंतर देखील बेकायदा जोडले गेले आणि त्यानंतर त्याची बिले देखील भरून घेतली गेली असल्याचे निदर्शनास येत आहे. या संदर्भातील गंभीर तक्रार प्राप्त झाल्यानंतर आपण मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मुख्यमंत्री, विभागीय आयुक्त, औरंगाबाद, जिल्हाधिकारी, बीड, यांचे सह अन्य ठिकाणी या संदर्भात तक्रार केली आहे. ८५ कोटीची कर वसुली आणि वीज कनेक्शन तोडल्यानंतर पुन्हा जोडणी करून बिल भरून घेणे, या बाबी जाणीवपूर्वक केल्या जात आहेत. यात संगनमताने केले जात आहेत. त्याचप्रमाणे तहसीलदार, बीड यांनी उपअधीक्षक, भूमी अभिलेख, बीड यांना गुगल मॅप द्वारे ई.टी.एस. मोजणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश ९ जानेवारी २०२४ रोजी दिले आहेत. मात्र उपअधीक्षक, भूमी अभिलेख यांनी देखील यावर कुठलीही कारवाई केली नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे त्यांचे देखील संगणमत असल्याचे दिसते. मंडळ अधिकारी, तलाठी आणि तहसीलदार यांनी यावर तात्काळ लक्ष देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे वीज मंडळाच्या स्थानिक अभियंता यांनी आपापल्या भागातील वीज चोरीकडे लक्ष देणे देखील आवश्यक आहे. मात्र ते देखील लक्ष देत नाहीत. त्यामुळे या तपासण्या अचानक धाड टाकून करण्याची मागणी वरिष्ठांकडे करण्यात आली आहे. तसेच ही तक्रार शासनाच्या भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या बैठकीत ठेवावी. या सर्व

पुढील पानावर

# ठाकरेसाहेबांचे हात बळकट करण्यासाठी सातपुतेंच्या उपस्थितीत आढावा बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्याभरातून विविध तालुक्यातून अठरा पगड जातीचा युवा वर्ग बीड शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या पाठीशी उभारत असून जिल्ह्याभरात पुन्हा एकदा नव्या जोमाने, उत्साहाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष बळकट आणि सशक्त होताना दिसून येत आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे हात बळकट करण्यासाठी आणि त्यांना जिल्ह्यात नवी उभारी देण्यासाठी बीड शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते ताकदीनीशी कामाला लागले आहेत. आगामी निवडणुकांच्या दृष्टिकोनातून शिवसेनेची ताकद वाढवून जिल्ह्याभरात पक्षाला बळकटी देण्यासाठी परमेश्वर सातपुते यांनी जिल्हाभरात कार्यकर्त्यांची मोट बांधायला सुरु केले आहे. परमेश्वर सातपुते यांची कार्यपद्धती पाहून तरुणाई मोठ्या प्रमाणात प्रभावित होत असल्याचे दिसून येत आहे. शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, आमदार तथा मराठवाडा संपर्क नेते सुनीलजी प्रभू साहेब, उपनेत्या सुषमाताई अंधारे, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरूरकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख किशोरजी पोतदार साहेब, लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनीलजी धांडे सर, माजी मंत्री तथा सहसंपर्क प्रमुख बदामराव आबा पंडित, सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या



प्रमुख उपस्थितीत शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या प्रमुख उपस्थितीत माजलगाव येथील शासकीय विश्रामगृह येथे शिवसेना माजलगाव तालुका पदाधिकार्यांची आढावा बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळुंके, तालुकाप्रमुख प्रभाकर धरपडे, शहर प्रमुख ड.दत्ता रांजवन सर्व पदाधिकारी उपस्थित होते. याबरोबरच वडवणी येथील आनंद कॉम्प्लेक्स येथे शिवसेना वडवणी तालुका पदाधिकार्यांची आढावा बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. याप्रसंगी यावेळी जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार, वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे, उपतालुकाप्रमुख अशोक गोंडे, उपतालुकाप्रमुख श्रीराम झाटे,वचिष्ट नाना शेंडगे, सुर्डी येथील उपसरपंच कैलास थोटे, संजय धपाटे सरपंच,भौय्या खोसे, नवनाथ मोरे, अशोक चाटे, बळीराम नाईकवाडे, अविनाश बोंद्रे,परमेश्वर नागवे,श्रीमंत सावंत, युवा नेते विनोद गुंड पाटील,मोहन आप्पा मोरे,महादेव बोंद्रे, गोपीचंद मस्के,ज्ञानेश्वर नाईकवाडे, राहुल नागरगोजे,राम मोरे सह सर्व पदाधिकारी उपस्थित होते. यासोबतच धारूर येथील शासकीय विश्रामगृह येथे शिवसेना धारूर तालुका पदाधिकार्यांची आढावा बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली. याप्रसंगी जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार,धारूर चे माजी तालुकाप्रमुख विनायक ढगे,शहर प्रमुख बाबा सराफ ,तालुका संघटक दयानंद आदमाने,उपशहर प्रमुख हनुमंत फावडे,उपसरपंच कैलास थोटे, युवानेते विनोद गुंड पाटील,चंद्रसेन तिडके,आदिनाथ तिडके,अमोल सिरसट,राजकुमार शेटे,बलभीम मुंडे,व धारूर तालुक्यातील शिवसेना,युवासेना, शेतकरी सेनेचे आजी माजी पदाधिकारी बैठकीस उपस्थित होते. यासोबतच या बैठकीमध्ये पक्षबांधणीच्या दृष्टिकोनातून आनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या विषयी प्रेम आणि आत्मीयता महाराष्ट्रातील जनतेच्या मनात कायम आहे. शेतकरी, गोर-गरीब, सामान्य जनतेच्या मनात उद्धव बाळासाहेब ठाकरे हे नाव कोरल्या गेलेले आहे ते कुणीही काढू शकत नाही. कोण सोडून गेले आणि काय घेऊन गेले हे विसरा शिवसेनेचा भगवा गाव, वस्ती, वाडी तांड्यावर आपल्याला घेऊन जायचा आहे. सर्व सामान्याचे प्रश्न सोडवण्यासाठी आपल्या उद्धव साहेबांना साथ देयची आहे, शिवसेनेला मजबूत करायचे आहे. मी कायम आपल्या पाठीशी आहे त्यामुळे चिंता करू नका असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी माजलगाव, वडवणी, धारुर येथे संपन्न झालेल्या आढावा बैठकीत व्यक्त केले.

## बीडकरांचे रेल्वेचे स्वप्न पूर्णत्वाकडे




बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासाठी कामधेनू ठरणारा नगर-बीड-परळी रेल्वे प्रकल्प टप्प्याटप्प्याने पूर्णत्वाकडे जातो आहे, प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात आष्टी ते अंमळनेर या बत्तीस किलोमीटर ब्रॉडगेज मार्गाचा आणि प्रवाशी रेल्वेचा शुभारंभ केला. तर अंमळनेर येथे हा कार्यक्रम खा. डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. बीडकरांचे रेल्वेचे स्वप्न पूर्णत्वाकडे जात आहे, हा प्रकल्प औद्योगिक दृष्ट्या अतिशय महत्वाचा असल्यामुळे पुढील काळात बीड जिल्ह्यात औद्योगिक विकासाची पायाभरणी करून जिल्ह्यातील तरुणांच्या हाताला रोजगार मिळवून देण्याचा आमचा मानस असल्याचा निर्धार याप्रसंगी खा. प्रितमताई मुंडे यांनी व्यक्त केला. नगर-बीड-परळी रेल्वे मार्गातील आष्टी-अंमळनेर या बत्तीस किमी मार्गावर सुरु प्रवासी रेल्वेचा शुभारंभ करण्यात आला.

# वृध्द कलावंतांच्या मानधनात वाढ करा -राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

शाहु वृध्द साहित्यिक कलावंत मानधन योजने अंतर्गत राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय मार्फत वृध्द कलावंताना २२५० रुपयाचे मानधन दिले जाते. सदरील मानधन अपुरे असून, आजची महागाई लक्षात घेता मानधनात वाढ करून, किमान ५००० रुपये मानधन देण्यात यावे. तसेच शासनाच्या विविध शासकीय योजनेचा लाभ देण्यात यावा. विशेषतः शहरी व ग्रामीण भागातील घरकुल योजनेमध्ये वृद्ध कलावंतासाठी राखीव कोटा ठेऊन घरकुलाचा लाभ गरजवंत कलावंतांना देण्यात यावा अशी मागणी भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हा मराठी शाहीर परिषद व लोककलावंतांच्या शिष्ट मंडळाने राज्याचे सांस्कृतिक



कार्य मंत्री ना. सुधीर मूनगंटीवार यांच्याकडे केली आहे. मंत्री सुधीर मूनगंटीवार आगामी लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने आढावा बैठक घेण्यासाठी बीड येथे आले असता संघर्ष योद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय बीड येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी कलावंतांच्या शिष्ट मंडळाने भेट घेऊन आपल्या मागण्या मांडल्या . यावेळी खा. डॉ. प्रितमताई मुंडे, खा. डॉ. अजित गोपछडे, प्रदेश सरचिटणीस अॅड. माधवीताई नाईक, माजी आमदार आरटी देशमुख, राम कुलकर्णी, अॅड. सर्जेराव तांदळे, प्रा. देविदास नागरगोजे, सलीम जगाहीर, चंद्रकांत फड आदि उपस्थित होते. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आजच्या महागाईच्या काळात आपल्याकडुन मिळत असलेले मानधन हे खुपच तुटपुंजे आहे. कलावतांना अन्य उत्पन्नाचे साधने नसल्याने त्याला त्याच्या कुंटुंबाची गुजारणा करणे शक्य नाही. कलावंताने आपले आयुष्य कलेसाठी समर्पित केलेले असल्याने त्याला अन्य साधनाने काम करुन घर चालविणे शक्य होत नाही. म्हणून किमान त्यांचे कुटुंब सूरळीत चालावे यास अनुसरुन मिळणाऱ्या मानधनात आपण वाढ करुन २२५० रु ऐवजी ५००० रुपये करावे. त्या प्रमाणे कलावंतांना कला सादर करण्यासाठी गांव सोडून बाहेरगावी जावे लागते. त्यामुळे वेळेवर जेवन मिळत नाही. तथा कठीण परिस्थितीचा सामना करत आहे. त्या प्रसंगासी दोन हात करावे लागतात त्यामुळे कलावंताचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत. शरिर साथ देत नाही त्याची तब्येत खालावते. परिणामी कलावंत हा सर्वसामान्य माणसंपेक्षा कमी दिवस जगतो त्यामुळे नविन कलावंताना मानधन मिळवण्यासाठी अर्ज करण्यासाठीचे वय ५० वर्षे वरून ४० वर्ष करावे. व कलावंताचे उर्वरित आयुष्य आबाधित जगण्यासाठी शासकीय घरकुल योजनेत राखीव कोटा ठेवण्यात यावा.

# लोकसभा निवडणुकीत ठाकरेंच्या हाती मशालच

**मुंबई । वृत्तसेवा**

शिवसेनेच्या पक्ष आणि चिन्हाचा सर्वोच्च न्यायालयातील अंतिम फैसला लोकसभा निवडणुकीआधी होण्याची शक्यता मावळली आहे. कारण यावर १ मार्चला होणारी सुनावणी आता थेट १९ एप्रिलला होणार आहे. तेव्हापर्यंत लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागु झाली असेल, त्यामुळे आगामी लोकसभा निवडणूक ठाकरे गटाला मशाल चिन्हच घेऊन निवडणूक लढवावी लागु शकते. शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर पक्ष आणि चिन्हाचा निर्णय देताना निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह एकनाथ शिंदे गटाला दिले. या निकालाविरोधात ठाकरे गटाने याचिका



दाखल केली होती. आता हा कालावधी जवळपास नऊ-दहा महिने झाला असतानाही यावर सुनावणी झालीच नाही. शिवसेना पक्ष आणि चिन्हावर ताबा कुणाचा या संदर्भातली सुनावणी १९ एप्रिलला होणार आहे. तेव्हापर्यंत लोकसभेची आचारसंहिता घोषित झालेली असेल. कदाचित पहिला टप्पाही पार पडलेला असेल. त्यामुळे ठाकरे गटाला आता आहे त्याच मशाल चिन्हावर निवडणूक लढवावी लागण्याची शक्यता आहे. शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर शिवसेना पक्ष आणि चिन्हाचा वाद निवडणूक आयोगाच्या कक्षेत गेला. निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह एकनाथ शिंदेंकडे दिला. निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरोधात शिवसेना ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. यानंतर साधारण नऊ-दहा महिन्यांचा कालावधी लोटला. मात्र, आतापर्यंत या प्रकरणावर सुनावणी होऊ शकली नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाकडून शिवसेना ठाकरे गटाला 'शिवसेना- उद्धव बाळासाहेब ठाकरे' हे नाव आणि 'मशाल' हे पक्षचिन्ह देण्यात आले होते. पक्ष आणि चिन्हाच्या वादावरील सुनावणी न्यायालयात अजुनही प्रलंबित असल्यामुळे ठाकरे गट आगामी लोकसभा निवडणूक 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' या नावासह आणि 'मशाल' या पक्ष चिन्हासह लढवण्याची शक्यता आहे.

## पान १ वरून

### ८५ कोटींचे बेकायदा

अधिकाऱ्यांना अभिलेखासह उपस्थित करण्याचे राहण्याचे आदेश द्यावेत, असे हे अँड. अजित देशमुख यांनी जिल्हाधिकारी, बीड यांना सुचविले आहे. तसेच ही मागणी त्यांनी विभागीय आयुक्त, मधुकर आर्दड यांच्याकडे देखील नोंदवली आहे. जिल्हा प्रशासन अशा मोठ्या प्रकारात बघायची भूमिका घेत असल्याने हे प्रकार घडत आहेत. बेकायदा खडी क्रशर आणि खदानी चालू असल्यामुळे नागरिकांना धूळ आणि इतर त्रास देखील सहन करावा लागतो. या बाबीकडे कोणाचीही लक्ष नाही. जनता देखील झोपलेली असल्याने आपापल्या भागातील बेकायदा उद्योगावर त्यांची नजर नाही. त्यामुळे याच वेळी जनतेलाही आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपापल्या भागातील बेकायदा चालू असलेल्या या उद्योगावर नियंत्रण ठेवावे आणि हे उद्योग तात्काळ बंद करावेत. जोपर्यंत जनता पुढे येणार नाही, तोपर्यंत बघ्याची भूमिका घेणारे प्रशासन कामाला लागणार नाही. आपण या प्रकरणाकडे लक्ष घातले असून कारवाई न झाल्यास त्याचे गंभीर परिणाम अधिकाऱ्यांना भोगावे लागतील, असा इशाराही अँड. देशमुख यांनी दिला आहे. ६० पैकी ५३ खदानी आणि खडी क्रशरची संपली मान्यता, अनेकांना फक्त क्रेशरची मान्यता मात्र केले उत्खनन, हजार ब्रास उत्खननाचा कर मात्र खोदले दोन एकर, ई.टी.एस. मोजणी पासून भूमी अभिलेख दूर संगणमताने दूर, त्या-त्या भागातील तलाठी, मंडळ अधिकारी आणि तहसीलदार दोषी, वीज मंडळाच्या स्थानिक अभियंत्यांची चौकशी करण्याची मागणी, जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश कचराकुंडीत, कारवाई न झाल्यास ठोस भमिका घेणार, मुख्य सचिवांकडे तात्काळ दखल.

## संपादकीय

### निवडणुका

साधारणतः मार्चच्या पहिल्या आठवड्यामध्ये १७ व्या लोकसभेसाठीच्या सार्वत्रिक निवडणुकांचा बिगुल वाजवला जाण्याची शक्यता आहे. एक व्यक्ती एक मत हा राज्यघटनेने दिलेला मौलिक अधिकार आहे; परंतु हा अधिकार बजावण्यासाठीच्या निवडणूक प्रक्रियेची आजची स्थिती काय आहे? अमेरिकेत निवडणुकीच्या प्रचार मोहिमेसाठी उमेदवार स्वत: पैसा गोळा करतात. सर्व हिशेब जनतेसमोर मांडलेला असतो. आपण जगात खूप मोठे आहोत. सर्वात मोठी लोकसंख्या, सर्वात मोठी लोकशाही, सर्वात मोठी निवडणूक आणि तितकीच महागडीही. आपण गरीब असलो, तरी या बाबतीत आपल्यासमोर कोणतीच महाशक्ती टिकू शकत नाही अगदी सुपरपॉवरही. १९४७ पासून २०२४ पर्यंतच्या प्रवासात आपण बरेच काही मिळवले आणि पचविलेही आहे. या वाटचालीत निवडणुका सामान्यांच्या आवाक्याबाहेर जाताना दिसत आहेत. २०१९ च्या निवडणुकीत देशातील ९०० दशलक्ष मतदारांना आकर्षित करण्यासाठी राजकीय पक्षांकडून आणि उमेदवारांकडून सुमारे ६० हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले आणि ते २०१४ च्या तुलनेत दुपटीपेक्षा अधिक होते. एका अहवालानुसार, देशातील प्रत्येक लोकसभा मतदारसंघात एका मतासाठी सुमारे ७०० रुपये म्हणजे एकूण शंभर कोटी रुपये खर्च झाले. ही काही लहान रक्कम नाही. त्याचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीचे उदाहरण घेऊ. २०१६ च्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ६.५ अब्ज डॉलर खर्च झाले. ही निवडणूक अमेरिकेतील सर्वात महागडी निवडणूक म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रिकॉर्डमध्ये नोंदली गेली. २००९ च्या १५ व्या लोकसभेच्या निवडणुकीचे बजेट भारतात मागच्या वेळी झालेल्या निवडणुकीच्या तुलनेत १५ पट अधिक होते. तत्पूर्वीच्या निवडणुकीचा विचार केला, तर १९९३ मध्ये लोकसभा निवडणुकीवर ९ हजार कोटी, १९९९ मध्ये दहा हजार कोटी, २००४ मध्ये ३० हजार कोटी आणि २०१९ च्या निवडणुकीत ६० हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत. या दृष्टीने २०१४ च्या निवडणुकीत २००९ च्या तुलनेत दीडपट अधिक खर्च झाल्याचे दिसते. याप्रमाणे २०१९ मध्ये २०१४ च्या निवडणुकीच्या तुलनेत दुप्पट खर्च झाला. खर्चाचा आलेख असाच राहिला, तर २०२४ च्या निवडणुकीत १ लाख २० हजार कोटी रुपये खर्च होऊ शकतात, असा अंदाज आहे. केवळ लोकसभा निवडणुकीचाच का विचार करायचा? देशातील लोकशाही व्यवस्थेतील पहिल्या पायरीवरच्या ग्रामपंचायत निवडणुकीचेही उदाहरण घ्या. उत्तर प्रदेशात सरपंचपदाच्या निवडणुकीत खर्चाची मर्यादा दहा हजार रुपये आहे, तर जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीची खर्चाची मर्यादा दीड लाख रुपये आहे; परंतु एवढ्यावर भागते का? प्रत्यक्षात सरपंचपदाची निवडणूक लढणारा व्यक्ती रोज दहा हजार रुपयांपेक्षा अधिक खर्च करतो. दारू पार्ट्या, मांसाहारी जेवणाचा बेत, प्रचार यंत्रणांवरील पेट्रोलचा खर्च, कधी पर्स तर कधी साड्या वाटप अशा खर्चाला काही मर्यादा नाही. जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीतील खर्च तर कोटींच्या घरात जातो. विधानसभा मतदारसंघ असोत किंवा लोकसभा मतदारसंघ असोत, आज निवडणुका खूपच महाग झाल्या आहेत. परिणामी, निवडणूक लढवणे ही बाब सामान्यांच्या आटोक्याबाहेर गेली आहे. लहानसहान पक्षांचे तर निवडणूक लढण्याचे कामच राहिलेले नाही.

# नगर जिल्ह्यात क्षेत्रफळाच्या बरोबरीने वाढले गुन्हे

**नगर । वृत्तसेवा**

राज्यात क्षेत्रफळाने सर्वाधिक मोठा असलेला जिल्हा अशी अहमदनगरची ओळख असली तरी ती आता बदलते की काय? अशी परिस्थिती निर्माण होवू पाहते आहे. गुन्हेगारीच्या आकडेमोडीत नगर राज्याच्या पटलावर झळकण्याची चिन्हे दृष्टीपथास येत आहेत. गत वर्षभरात तब्बल १४ हजार ७७ विविध प्रकारचे गुन्हे घडले असून त्यातील ९ हजार ६७४ उघडकीस आले. उर्वरित गुन्हे 'तपासावर' आहेत. खून, दरोडा, चोरी, घरफोडी, जबरी चोरी, अत्याचाराच्या घटना सर्रासपणे सुरू आहेत. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याकरीता ३३ पोलिस ठाणे आहेत. या पोलिस ठाण्यातंर्गत आकडेवारी पाहता वर्षामध्ये गंभीर स्वरूपाचे सुमारे १४ हजार ७७ गुन्हे दाखल झाले तर, त्यातील ९ हजार ६७४ गुन्हे उघडकीस आले. गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असले तरी गुन्हे उघकीस येण्याचे प्रमाणही त्या तुलनेत चांगले, हाच काय तो दिलासा म्हणावा लागेल. राहुरी तालुक्यातील




वकील दाम्पत्याचे दुहेरी हत्याकांड, श्रीगोंदा तालुक्यात प्रियकरांच्या मदतीने पत्नीने पतीचा केलेला खून असे काही गुन्हे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या काही तासांत उघडकीस आणले. याशिवाय जनावरे, शेतमाल चोरणारी टोळ्यांचाही पोलिसांनी पर्दाफाश केला. खून, दरोडा, बलात्कार अशा घटनांमध्ये वाढ झाली आहे. २०२३ मध्ये खुनाचे १०५ गुन्हे घडले. त्यातील सुमारे १०० गुन्ह्यांची उकल होत आरोपींना अटकही झाली. पाच गुन्ह्याचा शोध मात्र अद्यापही सुरूच आहे. फसवणुकीचे ३४२ गुन्हे घडले. त्यातील केवळ २७४ गुन्ह्यांचा शोध लावण्यात पोलिसांना यश मिळाले. तर, अपहराच्या ९७ गुन्ह्यांनी पैकी ८५ उघडकीस आणले. तर, गतवर्षांमध्ये चोरीचे ४ हजार ३४७ गुन्हे घडले. त्यापैकी एक हजार ६२ गुन्ह्यांची उकल झाली. पोलिसांकडून गुन्ह्यांची उकल होत असली तरी गुन्हे घडण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालेले आहे. दरम्यान, नगर शहरामध्ये धारदार शस्त्राने मारहाणीच्या घटना वाढत चालल्या आहेत. तर, काही घटनांमध्ये आरोपींनी पिस्तुलाचाही वापर केला आहे. क्षुल्लक कारणावरून गोळीबार केला जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे दिसते. गंभीर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केल्याचे दिसून येते. त्यामुळे स्थानिक पोलिसांचे खबर्याचे नेटवर्क कमी पडल्याची चर्चा आहे. गावोगाव ग्राम सुरक्षा दलाची निर्मिती करण्यात आली होती. ग्रामसुरक्षा दल मित्र म्हणून काम करीत होते. रात्रीच्यावेळी गावात गस्त घालणे, गावाचे संरक्षण असे काम ग्रामसुरक्षा दल करीत होते. परंतु, आता ग्रामसुरक्षा दलही वार्यावर असून, त्याकडे कोणाचेही लक्ष नाही. परिणामी शेमालाची चोरी, जनावरांची अशा घटना घडत आहेत.

# भाजपला पराभूत करा -हिंगे पाटील

**लातूर । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा श्रद्धेय प्रकाश आंबेडकर यांनी भाजपला पराभूत करा यासाठी ठिकठिकाणी आव्हान केले आहे.या आव्हानाला प्रतिसाद देत आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपला पराभुत करा असे आवाहन मराठवाडा अध्यक्ष तथा लातुर प्रभारी अशोक हिंगे पाटील यांनी निलंगा येथे वंचित बहुजन आघाडी कार्यकर्ता प्रवेश सोहळा व मेळाव्यात अशोक हिंगे पाटील यांनी केले.मार्च एप्रिल मध्ये होत असलेल्या लोकसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने लातूर जिल्ह्याचे प्रभारी अशोक हिंगे पाटील हे निलंगा येथे पक्षप्रवेश सोहळा व मेळाव्यासाठी आले होते. त्यामध्ये त्यांनी बाळासाहेबांचे हात बळकट करण्याचे आव्हान केले आहे. कुठल्याही परिस्थितीत केंद्रात भाजपचे सरकार स्थापन होऊ द्यायचे नाही ही कार्यकर्त्यांनी मनाशी खुणगाठ बांधावी व कामाला लागावे असे आवाहन त्यांनी केले. या मेळाव्यात विविध समाजातील अनेक महिला व पुरुषांनी वंचित मध्ये जाहीर प्रवेश केला. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करून पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून कार्यकर्ता मेळाव्याला सुरुवात झाली. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते, त्यांच्यासोबत वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा महासचिव रमेश गायकवाड लातूर जिल्हाध्यक्ष सय्यद सलीम,जिल्हा महासचिव ड.रोहीत सोमवंशी,जिल्हा उपाध्यक्ष शेख हमीद,युवक जिल्हाध्यक्ष युवराज जोगी, महासचिव नितीन गायकवाड लातुर तालुकाध्यक्ष सुनील कांबळे, लातुर शहराध्यक्ष सचीन गायकवाड निलंगा तालुका अध्यक्ष तथा आयोजक सुनील सूर्यवंशी, यांनी कार्यक्रमाची प्रस्तावित केले.नितीन सुरवसे,निलंगा महिला तालुकाध्यक्षा वंदनाताई सूर्यवंशी, शहराध्यक्षा सुनीता लोकरेताई यांच्यासह पदाधिकारी आयुब खुरेशी,सचिन गायकवाड सय्यद अन्वर,हरिदास साळुंखे,अंकुश कांबळे सह मेळाव्याला शहर व ग्रामीण भागातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



# उर्वरित नुकसान भरपाई कधी मिळणार?

**पुणे । वृत्तसेवा**

राज्यात ऑगस्ट महिन्यात पावसाने दडी मारल्यानंतर खरिपातील बहुतांश पिकांना फटका बसला. त्यानंतर प्रधानमंत्री खरीप पीकविमा योजनेतून राज्यातील ५० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना सुमारे २२०० कोटी रुपयांची २५ टक्के अग्रीम (ॲडव्हान्स) नुकसानभरपाई जाहीर करण्यात आली; मात्र चार महिने उलटल्यानंतरही केंद्र सरकारने धोरण निश्चित न केल्याने उर्वरित ७५ टक्के नुकसानभरपाई रखडली आहे. परिणामी शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे. राज्यात ऑगस्टमध्ये पावसामुळे मोठा खंड पडला. खरीप पीकविमा योजनेतील तरतुदीनुसार २१ दिवसांपेक्षा जास्त खंड असल्यास व उत्पादनात ५० टक्क्यांपेक्षा घट आल्यास नुकसानभरपाई देण्यात येते. त्यानुसार राज्यातील २४ जिल्ह्यांमधील ५० लाख ९४ हजार ४६७ शेतकऱ्यांना २ हजार २०६ कोटी रुपयांची २५ टक्के अग्रीम जाहीर करण्यात आली. उर्वरित ७५ टक्के नुकसानभरपाई देण्यासाठी कृषी विभागाच्या पीक कापणी प्रयोग अहवालाचा आधार घेतला जातो. या पीक कापणी अहवालातून संबंधित महसूल मंडळाचे सरासरी उत्पादन ठरविण्यात येते. नुकसानभरपाई देताना सरासरी उत्पादन उंबरठा उत्पादनाच्या कमी असल्यास पूर्वी दिलेली पंचवीस टक्के अग्रीम वजा करून उर्वरित रक्कम विमा कंपन्यांकडून दिली जाते. त्यानुसार कृषी विभागाने तयार केलेल्या पीक कापणी अहवालाचे आकडे विमा कंपन्यांच्या पोर्टलवर पीकविमा पोर्टलवर अपलोड करण्यात आले आहेत. उत्पादनाचे हे आकडे गृहीत धरून विमा कंपन्या नुकसानभरपाईचा दावा निश्चित करणार आहे. त्यानंतर शेतकऱ्यांना उर्वरित नुकसानभरपाई मिळू शकणार आहे. सध्याचे सरासरी उत्पादन उंबरठा उत्पादनापेक्षा जास्त असल्यास या परिस्थितीत नुकसानभरपाई मिळणार नाही; मात्र यापूर्वी दिलेली पंचवीस टक्के अग्रीम रक्कम वसुली केली जाणार नाही, असे पीकविमा योजनेचे निकष आहेत; मात्र विमा कंपन्यांना दावे निश्चित करण्यासाठी केंद्र सरकारचे धोरण अंतिम होणे अपेक्षित आहे. यासंदर्भात गेल्या चार महिन्यांपासून कृषी विभागाने केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करूनही हे धोरण अद्याप निश्चित झालेले नाही. कृषी विभागाचा पीक कापणी अहवाल तयार होऊन विमा कंपन्या दावे निश्चित करण्यासाठी तयार आहेत; मात्र धोरणच नसल्याने दाव्यांची निश्चिती कशी करणार, असा पेच कंपन्यांपुढे उभा ठाकला आहे. दावे निश्चित न झाल्याने नुकसानभरपाई किती असेल, याची आकडेवारी अंतिम करण्यातही कृषी विभागाला शक्य झालेले नाही. त्यामुळे केवळ केंद्र सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यांची ७५ टक्के नुकसानभरपाई रखडली असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. पीक कापणी अहवालात कापूस, तूर व भात ही जास्त कालावधी असलेल्या पिकांचा समावेश करण्यात आलेला नाही.

**मा. ॲड. अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर**

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, डॉ. हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बालउदयानाच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता. जि. बीड. 431122. (मल्टीस्टेट को. ऑप, सोसायटीज ॲक्ट 2002 आणि अब्रिट्रेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस/समन्स** दिनांक 27/02/2024

अर्जदार : खोलेश्वर मल्टीस्टेट को. ऑप, क्रेडिट सोसायटी लि. दिंदुड ता. माजलगाव जि. बीड

**विरूध्द – गैरअर्जदार**

1. लवाद अर्ज क्र. 171/2024 (1) सुदीप संपत आरे (कर्जदार) (2) संतोष अशोक शिंदे दोघे रा. चिंचाळा ता. वडवणी जि. बीड (जामीनदार)2. लवाद अर्ज क्र. 176/2024 (1) गोपाल लाला राठोड (कर्जदार) रा. जामगा तांडा पो तालखेड ता. माजलगाव जि. बीड 3. लवाद अर्ज क्र. 181/2024 (1) कविता श्रीकृष्ण मुंडे (कर्जदार) रा. दामोदर नगर, कोरेगाव भिमा ता. दौंड जि पुणे (2) अरूण शिवरतन केंद्रे रा. सिरसाळा ता. परळी जि. बीड (जामीनदार) 4. लवाद अर्ज क्र. 186/2024 (1) रामचंद्र लक्ष्मण नाईकनवरे रा. हरिशचंद्र पिंपरी ता. वडवणी जि. बीड (कर्जदार) 5. लवाद अर्ज क्र. 187/2024 (1) धोंडीराम पांडुरंग कोथिंबीरे (कर्जदार) (2) बिबीषन धोंडीराम कोथिंबीरे (3) सिध्देश्वर उत्तमराव कोथिंबीरे सर्व रा. कोंथिबीरवाडी, पो. दिंद्रुड ता धारूर जि. बीड.(दोघे जामीनदार) 6. लवाद अर्ज क्र. 188/2024 (1) शिवाजी बबन उपाडे (कर्जदार) (2) कृष्णा विठठल उपाडे दोघे रा. रेवली पो. सिरसाळा ता. परळी जि. बीड (3) दत्तात्रय रामकिसन कुटे रा. वाका पो. सिरसाळा ता. परळी जि. बीड. (जामीनदार) 7. लवाद अर्ज क्र. 189/2024 (1) रंजित ताणेराम मोरे रा. पाण्याची नविन टाकी, सिरसाळा ता. परळी जि. बीड (राजेश वसंत मेंडके यांच्या कर्जाला जामीनदार) 8. लवाद अर्ज क्र. 190/2024 (1) सचिन श्रीकांत रूद्रवार रा.समता कॉलनी, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड (दत्तात्रय गोविंद गजमल यांच्या कर्जाला जामीनदार) 9. लवाद अर्ज क्र. 191/2024 (1) अजित राजेश भोसले (कर्जदार) (2) अनुष्का अजित भोसले दोघे रा. शिवाजी चौक, खोरेगल्ली , गल्ली नं 3 लातुर ता. जि. लातुर (जामीनदार) 10. लवाद अर्ज क्र. 192/2024 (1) राजाभाउ ज्ञानोबा बडे रा. खामगाव पो. सिरसाळा ता. परळी जि. बीड( आदित्य वसंत मेंडके यांच्या कर्जाला जामीनदार) 11. लवाद अर्ज क्र. 193/2024 (1) सुनिता अंगदराव अंधारे रा. दिंद्रुड ता माजलगाव जि. बीड.(कर्जदार बाळु अंगदराव अंधारे मयत यांचे वारस) 12. लवाद अर्ज क्र. 195/2024 (1) रंगनाथ लक्ष्मण सोळंके (कर्जदार) रा. दिंद्रुड ता माजलगाव जि. बीड. (2) जालिदर हरीभाउ झाटे (3) संजय जालिंदर झाटे रा. दोघे देवडी पो. खळवट लिंमगाव ता. वडवणी जि. बीड (जामीनदार)

सदर नोटीसव्दारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूध्द वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावणी नोटीस आपणापैकी काहींनी घेवून गैरहजर राहिलात, काहींनी नोटीस नकार दिला तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच काहींच्या नोटीसा तामिल होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशीकामे आपण **दि. 19/03/2024** रोजी सकाळी तुम्ही अथवा तुमच्या वकिलांमार्फत लवाद न्यायाधिकरण कार्यालयास न चुकता हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास, त्या बाबतीत तुमचे काहींही म्हणणे नाही, असे समजून तुमच्या विरूध्द लवाद अर्जाचा एकतर्फी हुकुम / आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस माझी सही व शिक्यानिशी दिली आहे.

शिक्का

ॲड. अजित एम. देशमुख,
लवाद अधिकारी, बीड

# विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करा –हायकोर्ट

**नागपूर । वृत्तसेवा**

विदर्भातील सिंचन प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण होण्याकरिता उच्चस्तरीय समिती स्थापन करा, अशी विनंती लोकनायक बापूजी अणे स्मारक समितीने बुधवारी मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाला केली. न्यायालयाने या विनंतीची दखल घेऊन राज्य सरकारला यावर तीन आठवड्यात भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले. प्रकरणावर न्यायमूर्तीद्वय नितीन सांबरे व अभय मंत्री यांच्यासमक्ष सुनावणी झाली. यासंदर्भात समितीची जनहित याचिका न्यायालयात प्रलंबित आहे. गेल्या तारखेला राज्याचे मुख्य सचिव डॉ. नितीन करीर यांनी प्रतिज्ञापत्र दाखल करून विदर्भातील सिंचन प्रकल्पांची सर्वसमावेशक माहिती दिली होती. समितीने बुधवारी त्यावर प्रत्युत्तर सादर करून राज्य सरकार विदर्भाच्या सिंचन विकासाविषयी उदासीन आहे, असा आरोप केला. तसेच, विदर्भातील सिंचन प्रकल्प वेगात पूर्ण करण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न केले जात नाही, याकडेही लक्ष वेधून वरील विनंती केली. याचिकाकर्त्यांतर्फे ड. अविनाश काळे यांनी कामकाज पाहिले. सरकारच्या प्रतिज्ञापत्रानुसार, विदर्भातील वनक्षेत्र बाधित १३१ पैकी १६ (टाईप टू – ५ व टाईप थ्री – ११) सिंचन प्रकल्प रद्द करण्यात आले असून वन मंजुरीअभावी १० (टाईप टू – १ व टाईप थ्री – ९) प्रकल्पांचे काम अद्याप सुरू झाले नाही. आतापर्यंत केवळ ४६ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. त्यामध्ये टाईप–१ श्रेणीतील ४५ पैकी २२, टाईप–२ श्रेणीतील ३३ पैकी ८ व टाईप–३ श्रेणीतील ५३ पैकी १६ प्रकल्पांचा समावेश आहे. ५९ प्रकल्पांचे काम प्रगतिपथावर आहे. त्यात टाईप–१ श्रेणीतील २३, टाईप–२ श्रेणीतील १९ तर, टाईप–३ श्रेणीतील १७ प्रकल्पांचा समावेश आहे.

# भाजपच्या विचारांविरोधात लढा –खा.सुप्रिया सुळे

**पुणे । वृत्तसेवा**



माझ्याविरोधात लोकसभेला कोण उमेदवार असेल ते माहीत नाही. पण जेव्हा घोषणा होईल तो उमेदवार भाजपच्या विचाराचा असेल. माझा भाजपच्या विचारांविरोधात लढा आहे. त्यामुळे वैयक्तिक कोणाविरुद्ध लढाई नसून ती वैचारिक असेल, अशी प्रतिक्रिया खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली. बारामती येथे पत्रकारांशी बोलताना सुळे म्हणाल्या, बारामतीत २ मार्चला होणारा नमो महारोजगार मेळावा आणि उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे अद्याप मला निमंत्रण मिळालेले नाही. बारामतीत हे कार्यक्रम होत असल्याची माहिती मला पत्रकारांकडूनच मिळालेली आहे. २०१५ च्या शासनाच्या जीआरनुसार अशा कार्यक्रमांमध्ये स्थानिक लोकसभा, राज्यसभा खासदारांचे नाव घालावे लागते. बारामतीत तो प्रोटोकॉल पाळला जातो की नाही? हा प्रश्न आहे. आम्ही सत्तेत असताना प्रोटोकॉलचे काटेकोर पालन करत होतो. तत्कालीन स्थानिक खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांचे पत्रिकेत नाव नसल्याने तत्कालीन मंत्री शरद पवार यांनी कार्यक्रमाला येणे टाळले होते, अशी आठवण त्यांनी सांगितली. केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर माझा विश्वास असून, ते मला महारोजगार मेळाव्याला बोलवतील, अशी अपेक्षा सुळे यांनी व्यक्त केली. शरद पवार यांनी ५० वर्षांपूर्वी उभ्या केलेल्या विद्या प्रतिष्ठानमध्ये नमो महारोजगार मेळावा होतो आहे. ही संस्था त्यासाठी उपयोगी येते, याचा आनंद असल्याचा टोला त्यांनी लगावला. शिवाय विकासकामांच्या उद्घाटनाला मुख्यमंत्री व मान्यवर येत असतील तर त्यांचे स्वागत असल्याचे त्या म्हणाल्या. लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत असताना मी कधीही आमदारांच्या कामात हस्तक्षेप केला नाही. केंद्रातील कामांचा मी पाठपुरावा करत होते. आमदार राज्यातील कामांचा पाठपुरावा करायचे. बारामतीतील काम असेल तर मी अजित पवार यांच्याकडे संबंधितांना पाठवायचे. तीच पद्धत इतर तालुक्यांत वापरत होते. सत्तेचे विकेंद्रीकरण गरजेचे असल्याचे त्या म्हणाल्या. राज्यातील गुन्हेगारीच्या घटना पाहता, गृह मंत्रालय अपयशी ठरले आहे. सत्ताधारी आमदार पोलिस ठाण्यात गोळीबार करतो. कोयता गँग, ड्रग्ज रॅकेट सापडत आहेत. गृह मंत्रालय काय करतेय? असा सवाल त्यांनी केला. राज्यात आत्महत्या, गुन्हेगारी, बेरोजगारी वाढल्याची टीका सुळे यांनी केली. यावेळी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे शहराध्यक्ष ड. संदीप गुजर, युवक अध्यक्ष सत्यव्रत काळे आदी उपस्थित होते. खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत पक्ष कार्यालयात बुधवारी नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यात आल्या. जनता दरबार असा पत्रकारांनी उल्लेख केल्यावर सुळे यांनी दरबार या शब्दाबाबत हरकत घेतली. हा दरबार नाही. आमच्या कार्यकर्त्यांकडून तसा 'मेसेज' गेला असल्यास मी माफी मागते. हा जनता दरबार नसून जनतेच्या सेवेसाठी मी येथे असल्याचे सुळे यांनी सांगितले.

## राज्यातील पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई । वृत्तसेवा**




केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार अखेर राज्य पोलिस दलातील अधिकाऱ्यांच्या बदल्या पोलिस महासंचालक कार्यालयाला कराव्या लागल्या. याबाबतचे आदेश बुधवारी काढले. निवडणुकीशी संबंधित जबाबदारी असलेल्या पदावर तीन वर्षे वा त्यापेक्षा अधिक काळ असलेल्यांच्या बदल्या जिल्ह्याबाहेर करा, असे स्पष्ट आदेश राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी पोलिस महासंचालक कार्यालयाला दिले होते. असे असतानाही अनेकांच्या बदल्या जिल्ह्यातच केल्या. हे प्रकरण महाराष्ट्र प्रशासकीय लवादात (मॅट) गेले होते. शेवटी आयोगाच्या आदेशाविरुद्ध झालेल्या बदल्यांची पडताळणी आयोगाने केली. त्यानंतर २० अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा आदेश काढण्यात आला. यात छत्रपती संभाजीनगर शहर, ठाणे शहर, पुणे शहर, पिंपरी–चिंचवड, नागपूर शहर, नागपूर ग्रामीण आदी ठिकाणच्या अधिकाऱ्यांच्या समावेश आहे.

# नागपूरात स्थापत्य अभियंते रस्त्यावर

**नागपूर । वृत्तसेवा**

मृदा व जलसंधारण विभागाच्या ६७० जागेसाठी २० व २१ फेब्रुवारीला परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत अमरावती जिल्ह्यातील एआरएन असोसिएट्स ड्रीम लॅण्ड या सेंटरवर पेपर लीक झाल्याचा प्रकार घडला. या प्रकरणी एका विद्यार्थ्याला पोलीसांनी अटकही केली होती. या पेपर लीकवरून परीक्षा बसलेले स्थापत्य अभियांत्रिकीचे विद्यार्थी संतप्त झाले आहे. पेपर लीकमुळे होतकरू मुलांचे नुकसान होवू नये म्हणून फेरपरीक्षा घेण्यात यावी, या मागणीसाठी विद्यार्थी संविधान चौकात आंदोलनावर बसले आहे. मृदा व जलसंधारण विभागाची परीक्षा तत्काळ रद्द करावी यासंदर्भात विद्यार्थ्यांनी हातात फलकं घेऊन निदर्शने केली. नागपूरसह विदर्भातून जवळपास ५० वर परीक्षार्थी आंदोलनात सहभागी झाले होते.

## परभणीतील २९ रेशन दुकाने निलंबित

**परभणी । वृत्तसेवा**

सणासुदीच्या काळात गोरगरीब कुटुंबांपर्यंत आनंदाचा शिधा जावा, या हेतूने शासनातर्फे गत वर्षभरापासून संबंधित कीट रेशन दुकानाच्या माध्यमातून देण्यात येत आहे. यासंबंधीची रक्कम लाभार्थ्यांकडून घेऊन सुद्धा ती शासनाकडे जमा न केल्याने जिल्हा पुरवठा विभागाने जिल्ह्यातील २९ रेशन दुकानांचे परवाने निलंबित केले आहे. यात गंगाखेड तालुक्यातील सर्वाधिक २२ दुकानांचा समावेश आहे. वारंवार सूचना, निर्देश देऊन सुद्धा त्याकडे दुर्लक्ष करणे रेशन दुकानदारांना भोवले आहे. गत वर्षभरापासून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, गौरी गणपती, दिवाळी आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या कालावधीत शासनाकडून रेशन कार्डधारकांना आनंदाचा शिधा रेशन दुकानदारांच्या मागणीनुसार पुरवण्यात आला. अवघ्या शंभर रुपयात साधारण सहा ते सात अन्न धान्याची कीट या आनंदाच्या शिधामध्येशिधापत्रिकाधारककुटुंबातील लाभार्थ्यांना अवघ्या शंभर रुपयात देण्यात आली होती.

# लातूरात ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा ठिय्या


**लातूर । वृत्तसेवा**



ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगरपालिका व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करावी, यासह विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कामगार सेनेच्या वतीने काम बंद करीत जिल्हा परिषदेसमोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. बुधवारी तिसऱ्या दिवशीही हे आंदोलन सुरु होते. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन लागू करण्यात यावे. वेतन अनुदानासाठी लागू केलेली वसुलीची अट रद्द करावी, अशा विविध मागण्यांसाठी सोमवारपासून आंदोलन सुरु करण्यात आले आहे. बुधवारी तिसऱ्या दिवशीही आंदोलन सुरु होते. यावेळी जोरदार घोषणा देत जिल्हा परिषद प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. या आंदोलनात महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कामगार सेनेचे राज्य सरचिटणीस दयानंद येरंडे, मराठवाडा अध्यक्ष नवनाथ नरवडे, जिल्हाध्यक्ष सतीश मस्के, जिल्हा उपाध्यक्ष गोविंद लोभे, काशिनाथ कुसनुरे, सचिव किशोर मस्ने, सहसचिव मंगेश जाधव, कार्याध्यक्ष नंदकुमार माने, रंजित दोडके, अमोल गायकवाड, लक्ष्मण ठाकूर, अण्णाराव कांबळे, ज्ञानोबा कांबळे आदी सहभागी झाले होते. दरम्यान, आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हा परिषद प्रशासनास देण्यात आले.

# उन्हाळ्यात पाण्याचे कसे होणार?

**लातूर । वृत्तसेवा**



गत पावसाळ्यात पावसाने वार्षिक सरासरीही न गाठल्याने आणि दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने पाणीटंचाईची दाहकता अधिक गडद होऊ लागली आहे. जिल्ह्यातील आठपैकी तीन मध्यम प्रकल्प जोत्याखाली आहेत तर पाच प्रकल्पांमध्ये केवळ १२.४० टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. त्यामुळे यंदाच्या उन्हाळ्यात पाण्याचे कसे होणार? अशी चिंता ग्रामीण भागातील नागरिकांना लागली आहे. गत पावसाळ्यात कमी पाऊस झाल्याने परतीच्या पावसावर आशा होती. परंतु, तीही फोल ठरली. त्यामुळे जिल्ह्यातील नद्या, ओढे–नाले वाहिले नाहीत. परिणामी, मध्यम, लघु प्रकल्पांत अपेक्षित जलसाठा झाला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील काही गावांना डिसेंबरपासून पाणीटंचाईचे चटके जाणवू लागले. आगामी काळात पाणीटंचाई आणखीन तीव्र होण्याची भीती व्यक्त करत जिल्हा प्रशासनाने टंचाई निवारणासाठी उपाययोजनात्मक कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना केल्या आहेत. तसेच प्रकल्पातील पाणी आरक्षित केले आहे. फेब्रुवारीत पाणीटंचाई वाढली आहे. जिल्ह्यातील एकूण ११८ गावे आणि वाड्यांनी अधिग्रहणासाठी १६२ प्रस्ताव दाखल केले होते. पंचायत समितीच्या पाहणीनंतर ४ गावांचे ११ प्रस्ताव रद्द करण्यात आले. ८९ गावांचे १०३ प्रस्ताव तहसील कार्यालयाकडे सादर करण्यात आले आहेत. त्यापैकी २५ गावांना २८ अधिग्रहणांद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. जिल्ह्यातील औसा तालुक्यातील लामजना, खरोसा, टाका, अहमदपूर तालुक्यातील टेंभुर्णी, फुलसेवाडी, जळकोट तालुक्यातील येलदरा आणि लातूर तालुक्यातील चिंचोली ब., महापूर या आठ गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे या गावांनी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव पंचायत समितीकडे सादर केला. त्यापैकी एका गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. जिल्ह्यात एकूण आठ मध्यम प्रकल्प आहेत. त्यापैकी तावरजा, व्हटी आणि तिरू मध्यम प्रकल्प जोत्याखाली आहेत. त्यामुळे तिथे उपयुक्त पाणीसाठा शिल्लक नाही. उर्वरित पाच मध्यम प्रकल्पांत १५.१५३ दलघमी उपयुक्त पाणीसाठा आहे. त्यात रेणापूर – २.४५१, देवर्जन – १.७३९, साकोळ – २.४७०, घरणी – ३.९७७ आणि मसलगा प्रकल्पात ४.५१६ दलघमी उपयुक्त जलसाठा आहे.

## लोकसभा निवडणुकीसाठी राजू शेट्टींना मदत

कोल्हापूर – नांदणी ता. शिरोळ येथील भुपाल माणगावे यांचा आज ९१ वा वाढदिवस साजरा केला. त्यांचा मुलगा राजेंद्र माणगांवे यांनी माजी खासदार राजू शेट्टी यांच्या निवडणुकीसाठी ९१ हजारांचा निधी त्यांच्याकडे सुपर्द केला. शेट्टी म्हणाले, राजेंद्र मानगावे यांचा दोन दिवसापुर्वी फोन आला व त्यांनी सांगितले, २८ तारखेला वडिलांचा ९१ वा वाढदिवस कुटूंबियाच्यावतीने साजरा करणार आहोत आपण सायंकाळी भेट देवून शुभेच्छा देवून जावे. याप्रमाणे मी बुधवारी रात्री नांदणी येथील माणगावेकोडी मळ्यात शुभेच्छा देण्यासाठी गेलो. आई वडील दोघानांही शुभेच्छा दिल्यानंतर त्यांच्या ९१ व्या वाढदिवसानिम्मित माणगावे कुटूंबियाने चक्क लोकसभा निवडणुकीसाठी ९१ हजार रूपयाची लोक वर्गणी त्यांनी माझ्याकडे सुपुर्द केली. लोकसभेच्या २००४ पासून हे कुटुंबिय सातत्याने चळवळीसोबत राहिले आहे. गत वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत त्यांच्या नातवाच्या लग्नातही त्यांनी ५१ हजार रूपयाची देणगी दिली होती. आज वडीलांच्या ९१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचा मुलगा राजेंद्र माणगावे यांनी ९१ हजार रूपयाची लोकसभा निवडणुकीसाठी लोकवर्गणी देवून चळवळीस बळ देण्याच काम केल आहे. चळवळीवर प्रेम करणा–या अशा लोकांमुळेच मी गेल्या ३० वर्षापासून उजळ माथ्याने सांगत आलो आहे कि मी जन्माला आलो त्यावेळेस माझा हात स्वच्छ होता, ज्यावेळेस शेवटचा श्वास घेईन तेंव्हासुध्दा दुर्बिणीने शोधूनही माझ्या हाताला डाग सापडणार नाही.

## राज्य सरकारच अपयशी

मुंबई – मुख्यमंत्री कार्यालयात मुख्यमंत्र्याच्या खोट्या स्वाक्षऱ्या आणि शिक्के असलेली बनावट निवेदने आढळल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. राज्याचे प्रमुख असलेल्या मुख्यमंत्री कार्यालयात अशा प्रकारच्या घटना होतात हे गंभीर आहे.या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. की, मुख्यमंत्री कार्यालयात यापूर्वी सुद्धा विशेष कार्यकारी अधिकारी सहा महिने तोतया म्हणून कार्यरत होता. जर राज्याचा कारभार ज्या ठिकाणाहून चालतो त्या मंत्रालयातच तसेच मुख्यमंत्र्याच्या कार्यालयात राजरोसपणे तोतया विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून वावरत होता. इतकेच नव्हे तर त्या तोतयाने आठ महिन्यात अनेक अधिकाऱ्यांच्या बदल्या सुद्धा केल्या. कर्मचाऱ्यांच्या बदल्या, शासकीय दस्ताऐवज यांमध्ये हस्तक्षेप तो करत होता. स्वतः फाईल घेऊन मुख्यमंत्र्यांकडे जायचा आणि स्वाक्षरी घेऊन यायचा. तो खरा आहे की खोटा विशेष कार्यकारी अधिकारी आहे हे देखील मुख्यमंत्र्याना माहीत नव्हते ही अतिशय दुर्दैवी आणि चिंतेची बाब आहे. हा सर्व गोंधळ बघता राज्यात किती मोठ्या प्रमाणात अनागोंदी सुरू आहे सर्व जनतेला दिसत आहे. हे सर्व नेमकं चाललंय काय,याकडे शासन जबाबदारीने बघणार आहे की नाही असा संतप्त सवाल उपस्थित करत महाराष्ट्राचे धिंडवडे काढण्याचा हा प्रकार असल्याचे सांगून विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्री,उपपमुख्यमंत्री देखील डुप्लिकेट आणा अशी टीका केली. या प्रकरणाची राज्यसरकारने गंभीरतेने दखल घेतली असून पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे शिवाय त्याचा तपास सुरु आहे. याप्रकरणात कोणालाही पाठिशी घातले जाणार नाही. दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्टीकरण सरकारकडून यावेळी देण्यात आले.

## दहावीच्या परीक्षार्थींची संख्या यंदा वाढली



पुणे : राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्येत यंदा वाढ झाली आहे. यावर्षी एकूण १६ लाख ९ हजार ४४५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. त्यामध्ये ८ लाख ५९हजात ४७८ विद्यार्थी, ७ लाख ४९ हजार ९११ विद्यार्थीनी आणि ५६ तृतीयपंथी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. गतवर्षी १५ लाख ७७ हजार २५६ विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेला नोंदणी केली होती. राज्य मंडळाच्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) ची लेखी परीक्षेला उद्यापासून दि. १ मार्च सुरुवात होणार आहे. दि. १ ते २६ मार्च या कालावधीत परीक्षा पार पडणार आहेत. परीक्षेसाठी एकूण २३ हजार २७२ माध्यमिक शाळांमधून १६ लाख ९ हजार ४४५ विद्यार्थ्यांची नोंदणी केली आहे. राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत ५ हजार ८६ मुख्य केंद्रांवर दहावीची परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी, सचिव अनुराधा ओक यांनी दिली.

# बीडमधून लोकसभेसाठी पंकजा मुंडेंचे नाव निश्चित?



**बीड । प्रतिनिधी**

बीडमध्ये भाजपकडून लोकसभेसाठी कोण? या मुद्यावर पक्षांतर्गत बराच खल झाल्यानंतर माजी मंत्री पंकजा मुंडे यांचे नाव जवळपास निश्चित करण्यात आल्याची खात्रीलायक माहिती आहे. दुसरीकडे अमरावतीची जागा महायुतीमध्ये भाजपकडे जाईल आणि तेथे सध्याच्या खासदार नवनीतकौर राणा उमेदवार असतील, असेही समजते. विद्यमान खासदार प्रीतम यांचे दुसऱ्या पद्धतीने राजकीय पुनर्वसन केले जाण्याची शक्यता आहे. २०१४ ची पोटनिवडणूक आणि २०१९ ची सार्वत्रिक निवडणूक या दोन्हींमध्ये प्रीतम जिंकल्या होत्या. त्यावेळी त्यांचे बंधू धनंजय हे त्यांच्या विरोधात प्रचाराला उतरले पण यावेळी चित्र वेगळे आहे. पंकजा यांना उमेदवारी पक्की मानली जात असताना धनंजय हे त्यांच्या प्रचारात दिसतील. अमरावतीच्या अपक्ष खासदार नवनीत राणा भाजपकडून लढू शकतात. शिवसेनेचे धनुष्यबाण चिन्ह हे एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे आणि अमरावतीच्या मतदारांना हे चिन्ह अंगवळणी पडले आहे. त्यामुळे नवनीत यांनी शिवसेनेकडून लढावे, असा आग्रह झाला होता. तर अपक्ष लढल्यास पाठिंबा द्यावा, असा प्रस्ताव भाजपने अमान्य केल्याचे समजते. मंत्री धनंजय मुंडे आणि पंकजा या दोघांमधील दुरावा कमी झाला आहे. मुंडे भगिनींपैकी कोणीही उमेदवार असले तरी आपण पाठीशी भक्कमपणे उभे राहू असा शब्द धनंजय मुंडे यांनी भाजप नेत्यांना दिला आहे. पंकजाताईंच्या नावाची राज्यसभेसाठी चर्चा झाली होती पण तसे झाले नाही. तेव्हा, 'पंकजाताईंबाबत चांगलेच होईल' असे सूचक उद्गार उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी काढले होते.

## मोफत पोलीस भरती शिबिर

बीड – महाराष्ट्रात पोलीस भरतीच्या १७,४७१ पदासाठी पोलीस भरती जाहीर करण्यात आली होती आत्ता ह्या पोलीस भरती प्रक्रियेला सुरुवात झालेली आहे दि.१ मार्च २०२४ पासून जिल्हानिहाय पोलीस भरतीची वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध होऊन ५ मार्च २०२४ – ३१ मार्च २०२४ पर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहेत. १२ पास असलेल्या मुला–मुलींना या भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. गरीब,होतकरू मुला मुलींना आपले पोलीस भरती होण्याचे स्वप्न साकार करता यावे म्हणून ८ मार्च २०२४ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त युवक क्रांती दल व जय हिंद डिफेन्स अकॅडमी बीड यांच्या संयुक्त विद्यमाने ३ मार्च ते ५ मार्च २०२४ या दरम्यान चाणक्ष मंडळ गिराम कॉम्प्लेक्स, वाघमारे हॉस्पिटलच्या बाजूला डीपी रोड बीड येथे मोफत पोलीस भरती शिबिराचे आयोजन करण्यात असून

## विज्ञान दिन साजरा

बीड – शहरातील श्री छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयमध्ये दि.२८ फेब्रुवारी २०२४ रोजी डॉ. चंद्रशेखर व्यंकटरामन यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय विज्ञान दिवस विविध प्रयोग आणि त्याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांच्या मार्फत करून साजरा केला गेला.कार्यक्रम प्रसंगी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक,श्री भोसले सर, विज्ञान शिक्षक (प्राथमिक) जोगदंड सर, राऊत सर, खेडकर सर (प्राथमिक), दिपक सरवदे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बोलतांना शाळेतील विज्ञान शिक्षक दिपक सरवदे सर म्हणाले की, आज आपण केलेली असामान्य प्रगती केवळ विज्ञान मुळे शक्य झाली आहे. अंधश्रध्दा न बाळगता आपण आपल्या जीवनात मुलांना विज्ञान युक्त समाज घडविण्यास सज्ज केले पाहिजे. त्यासाठी शाळेत वैज्ञानिक दृष्टिकोन शिक्षकांनी निर्माण करून भावी शास्त्रज्ञ निर्माण करणे काळाची गरज आहे.

## कलाशिक्षक रमेश जाधव यांचे निधन

बीड – स्वर्गीय स्वातंत्र्य सैनिक बन्सीधरराव जाधव यांचे चिरंजीव तथा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे खाजगी स्वीय सहाय्यक



अशोक जाधव यांचे लहान बंधू रमेश बन्सीधर जाधव यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे ते ५२ वर्षाचे होते, त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं, दोन भाऊ, दोन बहिणी व परिवार असून आज दुपारी ३ वाजता मोंढा रोड येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. रमेश जाधव हे बीड येथील चंपावती विद्यालयात कला शिक्षक म्हणून कार्यरत होते.

## आघाव यांचे निधन

बीड –जगन्नाथ मारोती आघाव यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन. श्री आघाव हे जी प बीड येथे बांधकाम खात्यातुन अधीक्षक



पदावरून निवृत्त झाले होते.त्यांनी माजी जी प अध्यक्ष स्व श्री पंडितआण्णा मुंडे यांचे स्वीय सहाय्यक म्हणून ही काम केले होते.धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रात ही त्यांचा सहभाग होता.बीड येथील स्व ॲड श्री दिनकरराव राख व माजी मंत्री स्व डॉ.राख,जालना यांचे ते मावसभाऊ होते.त्यांचे मागे त्यांचे मुलं प्रा नितीन आघाव व प्रा निलेश आघाव ,पत्नी,सुना,पुतणे, नातवंडे असा बराच मोठा परिवार आहे. त्याच्यावर शुक्रवारी सायंकाळी ४ वा अंकुश नगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## मस्साजोग येथे मराठवाडा अध्यक्ष हिंगे यांचा सत्कार

बीड – मस्साजोग ता.केज येथे वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष यांचा लिंबराज



गायकवाड व सहकारी यांनी केला सत्कार. मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील सध्या जिल्ह्यातील विविध तालुक्याचे दौऱ्यावर फिरत असून पक्ष संघटना बांधणी, शाखा उद्घाटन संपर्क अभियान हाती घेतले आहे. त्या पार्श्वभूमीवर ते तालुका केज येथील मस्साजोग गावात आले होते. त्यांचा स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फसवणूक करणाऱ्या महिंद्रा कंपनीविरुध्द मुंबईतील आझाद मैदानावर करणार उपोषण

**बीड । प्रतिनिधी**

राज्य शासनाचा वनश्री पुरस्कार प्राप्त बीड येथील सखाराम शिंदे यांची महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडून खराब स्कॉर्पिओ जीप देवून फसवणूक केल्याची घटना २०१६ साली घडली. या प्रकरणी वारंवार संबंधित महिंद्रा कंपनीच्या डिलर आणि शोरुमकडे तक्रारी करुन नुकसान भरपाई देण्याची विनंती करुनही त्यांनी शिंदे यांना कोणतीही नुकसान भरपाई दिली नाही. त्यामुळे सखाराम शिंदे यांनी वैतागून संबंधित विमा कंपनी तसेच रोहित कमलनयन सबलोक व आनंद गोपाल महिंद्रा यांच्या विरुध्द फसवणूकीची तक्रार दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. तसेच या फसवणूक प्रकरणी आनंद महिंद्रा यांच्या विरुध्द मुंबईत आझाद मैदानावर येत्या ११ मार्च २०२४ पासून सहकार्यांसह उपोषण करणार असल्याचा इशारा दिला आहे.

या बाबत वनश्री सखाराम शिंदे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठवलेल्या निवेदनात झालेल्या फसवणूकीबाबत विस्ताराने माहिती नमुद केली आहे. सखाराम शिंदे यांनी म्हटले आहे, ३१ ऑक्टोबर २०१६ रोजी सबलोक कार्स बीड येथून स्कॉर्पिओ जीप (क्र.एम.एच.२३–४८७७) खरेदी केली होती. ही जीप घेतल्यानंतर तीच्या स्पेअर पार्टस्मध्ये खराबी सुरु झाली. ब्रेक वेळेवर न लागणे, जीपच्या चारही चाकातून आवाज येणे, पायंडल जॅम होणे अशा तक्रारी येवू लागल्या. त्यामुळे आम्ही ती जीप शोरुमला नेवून लावली असता तेथील कर्मचारी थातूर–मातूर काम करत त्यामुळे ती जीप नंतर आठ–दहा दिवस चांगली चालत असत परंतु पुन्हा खराब व्हायची. असे असतांनाच दि.१५ जून २०१७ रोजी मी व माझा मुलगा अक्षय शिंदे बीडहून नेकनूरकडे जीप घेवून जात होतो. आम्ही मांजरसुंबा घाटात पोहोचलो असतांना स्कॉर्पिओ जीपमधून अचानक धूर येवू लागला. त्यामुळे गाडी तात्काळ थांबून खाली उतरलो तितक्यात त्या जीपने अचानक पेट घेतल्याने स्कॉर्पिओ जागीच जळून खाक झाली. या बाबत आम्ही नेकनूर पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. महत्वाचे म्हणजे गाडीचा पूर्ण विमा उतरविलेला होता. सदरील जीप घेतल्यापासून दोन वर्षाची कंपनीची गॅरंटी व वॉरंटीही होती मात्र असे असतांनाही कंपनी व त्यांच्या डिलरकडून आमच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले गेले. गाडी पूर्ण जळून खाक झाल्यानंतर सखाराम शिंदे यांनी सबलोक शोरुम व महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीला घटनेची सविस्तर माहिती दिली व नुकसान भरपाईची मागणी केली. मात्र जीपचा पूर्ण विमा उतरविलेला असतांनाही संबंधितांनी घटना घडून ७ वर्षे लोटल्यानंतरही कोणतीही नुकसान भरपाई दिली नाही. सदरील स्कॉर्पिओ जीप सखाराम शिंदे यांनी श्रीराम फायनान्स कंपनीकडून कर्जावर घेतलेली आहे, मात्र कंपनीकडून फसवणूक झाल्याने कर्ज फेडता येत नसल्याने अनंत अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. तरी मला तातडीने योग्य ती नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा अन्यथा माझी फसवणूक करणार्या संबंधित विमा कंपनीसह रोहित कमलनयन सबलोक व महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे मालक आनंद गोपाल महिंद्रा यांच्या विरुध्द येत्या ११ मार्च २०२४ पासून मी माझ्या आठ ते दहा सहकार्यांसह मुंबई येथील आझाद मैदानावर उपोषणाला बसेल असा इशारा वनश्री सखाराम शिंदे यांनी दिला आहे.

## विधायक कार्याला मुख्य कार्यकारी अधिकारी पाटील यांच्या शुभेच्छा



**बीड । प्रतिनिधी**

किर्तन प्रवचन आणि अध्यात्मिक विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून मानवी जीवनात सुख समाधान आणि शांतता मिळते. धकाधकीच्या आजच्या काळात मन बुद्धी आणि चित्त शांत व स्थिर राहण्यासाठी तसेच समाधानासाठी आध्यात्मिक कार्याची मोठी मदत होते, असे प्रतिपादन बीड जिल्हा परिषदेच्या प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील यांनी केले. बीड येथील श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठानवर सुरू असलेल्या सर्वधर्म समभाव अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता मंगळवारी ह.भ.प. अतुल शास्त्री महाराज, भगवानबाबा संस्थान, तागडगावकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. निमंत्रित मान्यवरांचा स्वागत सोहळा ह.भप. अतुल शास्त्री महाराज यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास उपविभागीय पोलिस अधिकारी विश्वंभर गोल्डे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, अरुणनाना डाके, आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना संगीता देवी पाटील म्हणाल्या श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रम राबविते. समाजाला या उपक्रमाची मोठी गरज आहे. सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून बंधूभाव, सामाजिक ऐक्य आणि एकात्मता वाढीस मदत होते. प्रतिष्ठान आणि सर्वधर्म समभाव अखंड हरिनाम सप्ताहाच्या या विधायक कार्याला त्यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या. बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यावेळी आपल्या भाषणात म्हणाले, सामाजिक ऐक्य आणि बंधूभाव निर्माण होण्यासाठी अखंड हरिनाम सप्ताह हे महत्त्वाचे साधन आहे. सदाचार बंधुभाव या कार्यक्रमाच्या माध्यमातून निर्माण होण्यास मदत होते. माणसाच्या मनात एकमेका विषयी प्रेमाची भावना निर्माण होते. त्यामुळे गुन्हेगारीवृत्ती नाहीशी होते.संस्कारक्षम व धार्मिक कार्यक्रमात वेळोवेळी सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नारायण नागरे यांनी तर आभार प्रा.आर.टी. गर्जे, यांनी मानले. सप्ताह सोहळ्यास मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुरेश केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर केकान, कार्यकारी अभियंता मच्छिंद्र लाड, आदींनी भेट दिली. सप्ताह समितीच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

## ११ शेतकरी रेशीम संशोधन केंद्र कर्नाटक येथे प्रशिक्षणासाठी दाखल

**आष्टी । प्रतिनिधी**

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा बीड व कृषी विभाग यांच्या अंतर्गत व प्रकल्प संचालक आत्मा बीड सुभाष साळवे व तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २६ फेब्रुवारी ते १ मार्च २०२४ या पाच दिवसाच्या रेशीम प्रशिक्षणास (केंद्रीय रेशीम संशोधन केंद्र मैसूर(कर्नाटक) )येथे बीड जिल्ह्यातून आष्टी, पाटोदा, माजलगांव येथील एकूण २६ रेशीम उद्योजक शेतकरी आज पाच दिवसीय प्रशिक्षनासाठी हजर झाले.आष्टी तालुक्या मध्ये सद्या रेशीम लागवड मोठया प्रमाणावर होत असून शेतकरी वर्गास् या पासून चांगला नफा मिळत आहे तसेच हे पिक तालुक्यात नवीन असल्यामुळे त्यामधील काही अडचणी नवनवीन तंत्रज्ञान माहिती मिळावी म्हणून मैसूर येथील केंद्रीय रेशीम संशोधन केंद्र (कर्नाटक) येथे पाच दिवसाचे प्रशिक्षण.

# शिष्यवृत्ती संदर्भात ओबीसी समाजातील मुलावर अन्याय का?

**परळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मध्ये सर्वच मागासवर्गीय विभागासाठी विविध योजना राबवण्यासाठी त्रिमूर्ती सरकारने भरीव आर्थिक तरतूद केली पण अनुसूचित जाती–अनुसूचित जमाती मुलांसाठी १०० टक्के शिष्यवृत्ती दिली जाते मग ओबीसीच्या मुलासाठी ५० टक्के शिष्यवृत्ती दिली जाते असा भेदभाव का ? असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला .ओबीसीच्या सर्व मुलांसाठी सन २००३ ला नवीन



कायदा तयार करून महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी १०० टक्के ओबीसीच्या मुलांना शिष्यवृत्ती देण्यासंदर्भातला निर्णय घेतला आणि बजेटमध्ये आर्थिक तरतूद करून तात्काळ अंमलबजावणी करण्यासंदर्भात आदेश पारित केले. केंद्र सरकार सर्वच एससी एसटी ओबीसी च्या मुलांना १०० टक्के शिष्यवृत्ती योजना राबवत आहे .पण राज्य सरकारकडून व्यवसायिक शिक्षणासाठी ५० टक्केच ओबीसीच्या मुलांना शिष्यवृत्ती का ? हा खरा प्रश्न आहे. तात्काळ शासन स्तरावर चौकशी समिती नेमून त्वरित खास बाब म्हणून १०० टक्के सर्व ओबीसीच्या मुलांना शिष्यवृत्ती देण्यासंदर्भात अंमलबजावणी करण्याचे आदेश काढण्याचे मागणी काँग्रेस नेते वसंत मुंडे यांनी केली . व्यावसायिक शिक्षण संस्थेकडून आस्थापना कर्मचारी शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क व इतर शुल्क वसूल ५०% विद्यार्थी कडून वसूल करतात.

## आंबेडकरी समाजाच्या तीव्र आंदोलनापुढे अखेर पोलिसांना झुकावे लागले

**परळी । प्रतिनिधी**

अनुसूचित जाती आणि जमातीचे कवच कुंडल असणाऱ्या ॲट्रॉसिटी कायद्या विषयी बेताल आणि आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या मानसिक विकृत अभिनेत्री केतकी चितळे आणि संयोजक बाजीराव धर्माधिकारी यांच्या विरोधात परळी शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला आहे .तमाम आंबेडकरी समाजाच्या तीव्र आंदोलनानंतर अखेर पोलिसांना चितेळेवर गुन्हा दाखल करावाच लागला. परळीत राज्यस्तरीय ब्राह्मण ऐक्य परिषद संपन्न झाली होती .या परिषदेत बोलताना मानसिक विकृत असणाऱ्या व महापुरुषांबद्दल नेहमीच आक्षेपार्ह बोलणाऱ्याअभिनेत्री केतकी चितळे हिने ॲट्रॉसिटी हा पैसे कमावण्याचा साईड बिझनेस आहे .ॲट्रॉसिटीचे रॅकेट आहे .खोट्या ॲट्रॉसिटी दाखल केल्या जातात अशा प्रकारचे बेताल आणि विधान करून तमाम अनुसूचित जाती जमातीचा अवमान केला होता. दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. याबरोबरच मराठा आरक्षणासाठी लढा देणाऱ्या मनोज जरांगे यांच्या आंदोलकांना येड्याची जत्रा म्हणून संबोधले गेले .व त्यांचा अवमान केला होता.या घटनेचे तीव्र पडसाद संपूर्ण बीड जिल्ह्यात उमटले होते. जिल्ह्यात अनेक ठिकाणी निदर्शने करण्यात आले होते.परळी येथील आंबेडकरी बांधवांनी आणि सकल मराठा समाजाच्या वतीने परळी शहर पोलीस तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन दिले.

# निराधार योजनेच्या उत्पन्नासाठी वृध्दांच्या तहसीलदारांच्या दालनासमोर रांगा

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यामध्ये वृद्ध व निराधार लोकांसाठी केंद्र शासनाने व राज्य शासनाने ज्यांना आधार नाही व जे लोक निराधार आहेत ज्यांचे वार्षिक उत्पन्न २१ हजार रुपये आहे मात्र यामध्ये खरे पाहिले तर वयोवृद्ध असलेल्यांना काहीच रोजगार अथवा इनकम नसते परंतु शासनाच्या या योजनेमध्ये शासनाने लावलेल्या २१ हजार रुपये वार्षिक उत्पन्नाचे इन्कम शासनाने असणे अनिवार्य केल्यामुळे या उत्पन्नासाठी वयोवृद्ध असणाऱ्या वृद्धांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी उत्पन्नाचे प्रमाणपत्र आवश्यक असते हे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी व या उत्पन्नाच्या प्रमाणपत्रावर मा. तहसीलदार यांची सही घेण्यासाठी वृद्धांना तहसीलदार यांच्या दालना पुढे रांगा लावत बसावे लागत आहे. तर माजलगाव तहसील कार्यालयामध्ये या वयोवृद्धांसाठी व येणाऱ्या सर्व लाभार्थ्यांसाठी अनेक सुविधांचा अभाव असल्यामुळे या ठिकाणी एक ना एक दिवस अघटीत घटना घडू शकते. गोष्टीची तहसील प्रशासनास जराही काळजी नाही माजलगाव



तहसील कार्याला मध्ये कामकाजात निमित्त येणाऱ्या लोकांसाठी व लाभार्थ्यांसाठी किंवा वयोवृद्ध महिलांसाठी व पुरुषांसाठी येथे पिण्याच्या पाण्याची सोय नसून या कार्यालयामध्ये जनरेटर व महिलांसाठी स्वतंत्र बाथरूमची व्यवस्था नाही. या कार्यालयामध्ये बाथरूम असून या बाथरूम मध्ये पाण्याची कसली सोय नसल्यामुळे विशेष म्हणजे महिला वर्गांची कुचंबना होत आहे. या कार्यालयीन योजनेसाठी शासनाचे विशेष बजेट येत असते परंतु येथे असलेल्या कार्यालयामध्ये अनेक वर्षापासून सुविधांचा अभाव आहे. या कार्यालयामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नादुरुस्त फिल्टर हे फक्त शोभेची वस्तू म्हणून सर्वांना ज्ञात आहे. तसेच तहसील कार्यालयातील ओट्यावरती रिकामे मातीचे रांजण देखील हे शोभेच्या वस्तूच आहेत. हे कधीही पाण्याने भरले जात नाहीत. येथे येणाऱ्या वृद्धांना व येथे येणाऱ्या लाभार्थ्यांना पाणी पिण्यासाठी गावाबाहेरून येणारा बायपास रोड क्रॉस करून रोडवर असणाऱ्या हॉटेलवर पाणी पिण्यासाठी जावे लागते. यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता असून अघटित घटना घडू शकते याचे गांभीर्य येथील तहसीलदार यांना नसून मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी त्वरित गांभीर्याने या गोष्टीची दखल घेऊन या गोष्टीकडे लक्ष द्यावे. तर या तहसील कार्यालयामध्ये तहसीलदार या पदावर महिला अधिकारी आहेत मात्र त्यांना कार्यालयातील सोयीसुविधाचे कसल्याही प्रकारचे गांभीर्य नाही. कार्यालयात येनाऱ्या महिला व लाभार्थ्यांच्या मूलभूत गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. यासाठी पिण्याचे पाणी, स्वतंत्र बाथरूमची व्यवस्था करून या बाथरूम मध्ये पाण्याची सोय करणे आवश्यक आहे. असे कार्यालयीन कामकाजा निमित्त येणाऱ्या लाभार्थ्यांमधून बोलले जात आहे.

asianpaints
रूद्र कलर होम
आमच्याकडे सर्व प्रकारचे वॉटर कलर,सिमेंट कलर मिळतील.
प्रो.प्रा. वाघीरे 9146702323 8149800020
पत्ता : राष्ट्रवादी भवनसमोर, बार्शी रोड,बीड

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com